दूरध्वनी :

# ठाणे महानगरपालिका

"महापालिका भवन" जनरल अरुणकुमार वैद्यमार्ग,चंदनवाडी,पांचपाखाडी, ठाणे (प.) - ४००६०२.
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

संदर्भ क्र./ठा.म.पा./मख्या.-१/शविवि-२९/वियोअंक - ८४८ दिनांक :- २४/ ८ /२०२१

प्रति,
मा. उप वनसंरक्षक
तथा संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,
बोरिवली, मुंबई.

विषय :- कोलशेत ते भाईंदरपाडा दरम्यान असणारे सर्व्हीस रोडमध्ये येणारे ०.९९८४ हेक्टर वनक्षेत्र मिळणेबाबतचा वन (संवर्धन) अधिनियम १९८० चा प्रस्ताव.

महोदय,

मौजे कोलशेत ते भाईंदरपाडा ता. ठाणे दरम्यान येणारे ०.६०२५ हेक्टर वनक्षेत्र मिळणेबाबतचा वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आला होता. सदर प्रस्तावामध्ये उप वनसंरक्षक (संधारण) नागपूर, प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचे कार्यालय यांनी सुचित केल्याप्रमाणे वनेत्तर क्षेत्राची तपासणी करण्यात आली त्यावेळी मौजे कावेसर स.नं. १४२ व १५८ चे क्षेत्र खाजगी वन म्हणून निदर्शनास आले. सदर प्रस्तावात या स.नं. चे वनेत्तर क्षेत्र घेताना रस्त्याची रुंदी ६० मीटर घेण्यात आली होती. सदरचा प्रस्तावात हा सर्व्हीस रोड म्हणून प्रस्तावित करण्यात आलेला आहे व तो प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेच्या अखत्यारीत आहे. ठाणे महानगरपालिकेच्या डीपी नुसार सदरचा रस्ता हा ९ मीटर रुंदी एवढा आवश्यक आहे. त्यामुळे नव्याने प्रस्ताव सादर करताना वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्र हे ९ मीटर रुंदी विचारात घेऊन प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आला आहे. सदर नव्याने प्रस्तावित करण्यात आलेला प्रस्ताव हा ०.९९८४ हेक्टर करीता आहे. यामध्ये ०.६०२५ हे. क्षेत्र हे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे अखत्यारीत आहे व उर्वरीत ०.३९५९ हेक्टर क्षेत्र हे ठाणे वन विभागाच्या अखत्यारीतमधील आहे.

दि. ०४/०८/२०२१ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्स बैठकीमध्ये लोकप्रतिनिधी व वन विभागाचे संबंधीत अधिकारी हजर होते. सदर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेच्या अनुषंगाने या प्रस्तावात आवश्यक असणारे ९ मीटर सर्व्हीस रोडच्या रुंदीप्रमाणे उक्त ०.९९८४ हेक्टर वनक्षेत्र मागणीचा प्रस्ताव नव्याने प्रस्तावित करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार सदर प्रस्तावात मौजे कोलशेत येथील स.नं. २९१/०, मौजे कावेसर येथील स.नं. २९१/०, २९२/०, १४२/०, १५८/०, मौजे भाईंदरपाडा येथील स.नं. १६ चे एकुण क्षेत्र ०.९९८४ हेक्टर वनक्षेत्र मागणीचा प्रस्ताव आपणाकडे सादर करण्यात येत आहे.

शहर विकास व नियोजन अधिकारी,
शहर विकास विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE
ठाणे महानगरपालिका, ठाणे

Puttekar
26/08/2021
लिपीक
आवक जावक
वनसंरक्षक व संचालक
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली